# पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त

**मे. महाराष्ट्र मिनरल्स कार्पोरेशन लिमिटेड यांच्या कासार्डे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे सिलिका वाळू उत्खनन आणि वॉशिंग उत्पादन क्षमता ३ लाख टन प्रतिवर्ष वरुन ४,५०,७४२ टन प्रतिवर्ष करण्यासाठी आणि खाण लीजचा कालावधी वाढविणे या प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीबाबतचा इतिवृत्तांत.**

मे. महाराष्ट्र मिनरल्स कार्पोरेशन लिमिटेड यांच्या कासार्डे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे सिलिका वाळू उत्खनन आणि वॉशिंग उत्पादन क्षमता ३ लाख टन प्रतिवर्ष वरुन ४,५०,७४२ टन प्रतिवर्ष करण्यासाठी आणि खाण लीजचा कालावधी वाढविणे या प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी सोमवार दि. २८ ऑगस्ट, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता स्मित लॉन्स, नारकर पेट्रोलियमच्या मागील बाजूस, बंडवाडी रोड, कासार्डे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे आयोजित करण्यात आली होती.

मा. सह संचालक (जप्रनि), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-57 OF 2022 पत्र क्र. बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी–230808-FTS-0178 दि.08.08.2023 अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती गठीत करण्यात आली:-

१) मा. मच्छिंद्र सुकटे, - **अध्यक्ष**
अपर जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग
जिल्हा-सिंधुदुर्ग

२) श्री. जगन्नाथ शं. साळुंखे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर,

३) श्री. राहुल दे. मोटे, - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि मंडळ, रत्नागिरी

श्री राहुल दे. मोटे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री मच्छिंद्र सुकटे, अपर जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री जगन्नाथ शं सांळुखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ आणि १४ ऑगस्ट, २०१८ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. महाराष्ट्र मिनरल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमसीएल), गाव-कासार्डे, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग, महाराष्ट्र यांचा त्यांच्या गाव-कासार्डे, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग, महाराष्ट्र येथील कार्यरत प्रकल्पात सिलिका वाळू उत्खनन आणि वॉशिंग उत्पादन क्षमता ३,००,०००.० टन प्रतिवर्षे वरुन ४,५०,७४२.० टन प्रतिवर्ष करणे आणि खाण लीजचा कालावधी वाढविणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिनांक २४-०६-२०२२ रोजी अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग बी-१ (ए) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १९-०७-२०२१ रोजी सादर केला व त्यास अर्जास ऑनलाईन मंजूरी दिनांक २१-१२-२०२१ रोजी प्रदान केली.

सदर अधिसुचने नुसार दि. २७.०७.२०२३ रोजीच्या स्थानिक वर्तमानपत्र * दैनिक तरुण भारत* व *दि इंडियन एक्सप्रेस* या वर्तमान पत्रांमध्ये या प्रकल्पाच्या जाहीर जन सुनावणी बाबतची नोटीस प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार या प्रकल्पा संदर्भात माहिती असलेले दस्तऐवज लोकांच्या माहिती करीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते.

१. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
३. महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र, सिंधुदुर्ग
४. संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३
५. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ, (मुख्यालय), कल्पतरू पॉईंट, सायन पूर्व, मुंबई - २२.
६. झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, सिव्हील लाईन, नागपूर-४४० ००१
७. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, उदयोग भवन, कोल्हापूर
८. उप विभागीय अधिकारी, कणकवली, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग.
९. तहसिल कार्यालय, कणकवली, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग
१०. सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कासार्डे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग
११. उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत नं. २, दुसरा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय कपांऊड, रत्नागिरी – ४१५ ६१२
१२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रत्नागिरी यांना सूचना/आक्षेप प्राप्त झाले नाही.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास त्या लेखी वा तोंडी स्वरुपात देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पाची एकूण गुंतवणूक ४८२.० लाख इतकी आहे. तर पर्यावरण व्यवस्थापनासाठी भांडवली खर्च अंदाजे - रुपये ७६.३६ लाख, तर आवर्ती खर्च - रुपये ५६.७१ लाख रुपये आहे. प्रकल्पात व परिसरात हरितपट्टा विकसित करण्यात येईल. त्याचप्रमाणे गेले अनेक वर्षे स्थानिकांच्या सामाजिक गरजांसाठी वेळोवेळी खर्च करण्यात आले, ते भविष्यातही करण्यात येईल. त्याचप्रमाणे कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी कृती आराखड्यासाठी रुपये ९,४६,२००/- ची तरतुद करण्यात आलेली आहे.

सादरीकरण झाल्यानंतर सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण पूर्ण केलेले आहे. तरी उपस्थितांना आवाहन करण्यात येते की प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपल्या ज्या काही सूचना, विचार किंवा आक्षेप पर्यावरणीय संदर्भात असतील, त्या उपस्थित करण्यात याव्यात. सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व राहण्याचे ठिकाण सांगण्यात यावे.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

**१) श्री अमोल जयवंतराव जमदाडे, राहणार-कासार्डे गाव, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग:-**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित केलेल्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीस मोठ्या संख्येने परिसरातील लोक उपस्थित आहेत, त्याबद्दल त्यांचे स्वागत. मी कासार्डे गावचा रहिवाशी असून माझे घर हे प्रकल्पापासून फक्त १- १.१/२ कि.मी. अंतरावरच आहे. सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे कासार्डे गावातील या खाणकाम उद्योगास ५५-६० वर्षांचा इतिहास आहे. जर २५ वर्षांची एक पिढी धरली, तर कासार्डे गावाच्या दोन पिढ्यां ह्या खाणकाम उद्योगाशी निघडीत आहेत. या गावातील व कोकणातील मुलगा मोठा झाला की तो मुंबईला मिलमध्ये किंवा दुस-या उद्योगात नोकरीसाठी जायचा व आपल्या आईवडिलांना पैसे पाठवायचा. येथे आईवडिल एकटे रहायचे तर

मुलगा तेथे एकटा राहून आपली गुजराण करायचा. गौरी-गणपतीसाठी किंवा दिवाळीसाठी कसाबसा यायचा.

मात्र या उद्योगामुळे येथील स्थानिकांना रोजगार येथेच उपलब्ध झालेला असून या खाणकाम उद्योगामुळे कासार्डे गावाचे नांव हे सर्व जगात गेलेले आहे. याचे सर्व श्रेय हे या व्यवसायालाच जाते. त्यामुळे मला याचा अभिमान आहे. या प्रकल्पामुळे या परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायाचा प्रचंड वाढ झालेली आहे. त्यामुळे येथील बाजारपेठेचा, किराणा दुकानांचा, भाजीपाला व्यवसायात वाढ झालेली आहे. प्रकल्पात स्थानिक व बाहेरुन आलेले असे ४००-५०० लोक प्रकल्पात काम करत आहेत.

करोनासारख्या महामारीच्यावेळी कंपनीने उपकरणे उपलब्ध केली, त्यामुळे रुग्णाचे तापमान मोजण्यास मदत झाली. येथील लोकांसाठी प्रचंड प्रमाणात मदत केली. ज्यांनी करोना लस घेतली, त्या रुग्णाचा डेटा व्यवस्थित राहणे गरजेचे होते. कंपनीस आम्ही निरोप दिल्यानंतर त्यांनी लगेचच प्राथमिक आरोग्य केंद्रास एक संगणक उपलब्ध करुन दिला. येथील स्थानिक शाळेत बेंच दिले. त्याचप्रमाणे खनिकर्म निधीतून गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रास एक रुग्णवाहिका (ambulance) दिलेली आहे. त्यामुळे रुग्णांची चांगली व्यवस्था होत आहे. त्याबद्दल त्यांचे आभार.

या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत प्रकल्प प्रवर्तकांना काही सूचना करायच्या आहेत.

अ) पर्यावरण संवर्धनासाठी या प्रकल्पातर्फे या परिसरात मोठ्या प्रमाणात स्थानिक प्रजातीची झाडे लावण्यात येऊन त्याचे संगोपन करण्यात यावे.

ब) प्राथमिक आरोग्य केंद्राच्या दोन रुग्णवाहिका आहेत. तरी परिसरातील जे आर्थिक दुर्बल घटक आहेत, त्यांना वैदकीय उपचारांसाठी दवाखान्यात जावे लागत असल्यास त्यावेळी त्या आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णास त्याच्या घरापासून ते दवाखान्यापर्यंत व दवाखान्यातून घरापर्यंत आणण्यासाठी मोफत सुविधा प्रकल्पातर्फे पुरविण्यात यावी.

क) प्रकल्पात कुशल व अकुशल कर्मचा-यांची मोठ्या प्रमाणात भरती होणार आहे. प्रकल्पास आवश्यक असणारे कुशल कामगार या गावात नसतील, तर प्रकल्पात जे हंगामी कर्मचारी आहेत, ते गेले काही वर्षे कार्यरत आहेत. जर प्रकल्पात मनुष्यबळाची आवश्यकता आहे, तर आमच्या कासार्डे गावातील व प्रकल्प परिसरातील हंगामी कर्मचा-यांना कायम सेवेत सामाऊन घ्यावे ही विनंती. माझ्या गावातील व परिसरातील लोकांना रोजगार हा मिळालाच पाहिजे.

ड) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पारित केलेले निर्देश कंपनीने तंतोतत पाळले पाहिजेत. या परिसरातील सामाजिक विकासात कंपनीचा सहभाग हा कंपनीच्या विकासाबरोबरच राहिल अशी आम्ही आशा करतो. प्रकल्पास स्थानीकांचा पाठिंवा आहे. म्हणून माझ्या गावातील तरुण-तरुणींना रोजगाराची संधि देण्यात यावी. येथील स्थानिक युवकांना आवाहन आहे की या व्यवसायात सहभाग करण्यात यावा.

२) **श्री सुरेश कराळे, राहणार- आनंदनगर, कासार्डे, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग, व्यवसाय-पत्रकार:-**

आज पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे. याची सूचना स्थानिकांना मिळालेली नाही. बैठकीत सांगण्यात आले की या जनसुनावणीची सूचना ही तीस दिवस अगोदर मराठीत तरुण भारतमध्ये तर इंग्रजीत इंडियन एक्सप्रेसमध्ये प्रकाशित करण्यात आली. मात्र येथे स्थानिकांना ते पेपर्स मिळालेले नाहीत. त्यावेळी बैठकीतील स्थानिकांनी दिशाभूल करणारे विधान करु नये असे मत मांडत पेपर मिळाल्याचे सांगून पेपर बैठकीत दाखविले.

श्री कराळे यांनी आक्षेप नोंदविला की सगळेजण पेपर वाचत नाहीत, तर गावात सभेची नोटीस फिरविली जाते, ती फिरविण्यात आलेली नाही. त्यामुळे बरेच लोक सभेस येऊ शकले नाही.

श्री कराळे यांनी आक्षेप नोंदविला की पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआय़ए) अहवाल हा कुठल्या शासनाच्या संस्थेकडून करुन घेतला याचा उल्लेख नाही. तसेच तो स्थानिकांना उपलब्ध झालेला नाही. तो मिळाला असता तर मुद्देसुद विषय मांडता आले असते.

सादरीकरणात कंपनीने अनेक सामाजिक योजना राबविल्या असा उल्लेख केलेला आहे. तर त्या सामाजिक योजनांचे नियंत्रण कोण करते याबाबत काहीही उल्लेख नाही. याबाबत काही यंत्रणा आहे काय, त्याबाबत राबविण्यात आलेल्या सामाजिक योजनांची सदस्यस्थितीबाबत माहिती देणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे किती स्थानिक गावातील लोकांना रोजगार देण्यात आला व एकंदर प्रकल्पात किती लोक कुठल्या संवर्गात काम करतात याची माहिती नाही. तसेच प्रकल्पासाठी प्रस्तावित खर्च व रोजगार याचे प्रमाण दर्शविलेले नाही. प्रकल्पात ८४ व्यक्तींना रोजगार देण्यात येईल असे सांगितले. तर प्रकल्पासाठी किती खर्च केल्यानंतर किती रोजगार उत्पन्न व्हायला पाहिजे हे महाराष्ट्र शासनाने घोषित केलेले आहे. ते येथे मिळतेजुळते आहेत का याबाबत काही माहिती नाही. स्थानिक तरुण-तरुणींना आगाऊ कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन प्रकल्पात रोजगाराची संधि देणार का याबाबत अहवालात भाष्य केलेले नाही.

अहवालात नमूद करण्यात आले की सदरहू प्रकल्प येथे गेले पन्नास वर्षे कार्यरत आहे. तर प्रकल्पाने गेले पन्नास वर्षात कुठे व किती हरितपट्टा विकसित केला हे गावक-यांना सांगावे ही विनंती. तसेच प्रस्तावित प्रकल्पात हरित पट्टा कुठे विकसित करणार याबाबत माहिती नाही.

ईआयए अहवालात नमूद केल्यानुसार सर्वेक्षण हे प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघात करण्यात आलेले आहे. पाणी, जंगल आणि जमिन यांवर सर्वांचाच अधिकार आहे. प्रकल्पामुळे येथील पाणी, जंगल आणि जमिन यांचे नुकसान झाले तर त्याचा त्रास हा ग्रामस्थांनाच होणार आहे. असे निदर्शनास येते की या परिसरातील पाणी हे खूपच खोल गेलेले आहे. सगळीकडे पाणी मिळत नाही. तर पाण्याचा उपसा कंपनी किती करणार याबाबत काहीही उल्लेख नाही. असे अनेक मुद्दे आहेत. ईआयए अहवाल आगाऊ मिळाला असता, तर त्याबाबत चर्चा करता आली असती. तरी येथे बोलण्याची संधी दिली, त्याबाबत धन्यवाद.

3) **श्री संजय दत्ताराम पाताडे, राहणार- कासार्डे – उत्तर दक्षिण गावठाण, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीत मी माजी व आजी सर्व लोकप्रतिनिधी यांचे आभार मानण्यास उभा आहे. १९६० साली महाराष्ट्राची निर्मिती झाली, माझा जन्म हा १९६८ चा आहे. येथील उपस्थित लोकप्रतिनिधींनी दूरदृष्टी दाखविली, कंपनीला सहकार्य करुन गावाच्या विकासासाठी सतत प्रयत्न केले, त्यासाठी ग्रामस्थांकडून कौतुक व मनापासून आभार. मी जन्मलो, तेव्हा गावाची स्थिती काय होती व आता कशी प्रगती आहे, तर त्याचे श्रेय या प्रकल्पास व येथील विविध खाणींना जाते. आज येथील स्थानिक लोक स्वतःच्या गाड्यातून येथे आले, ही सुबत्ता या महाराष्ट्र मिनरल्समुळे आलेली आहे. मी ब-याच वेळा

शिष्टमंडळ घेऊन गेलो. ही कंपनी - महाराष्ट्र मिनरल्स शेतक-यांचे प्रश्न विचारात लगेचच घेते. म्हणजे कंपनी प्रशासनास स्थानिकांविषयी आस्था आहे व आम्हांला त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे समाधान आहे. पूर्वी येथील वाळू ही कोल्हापूरला जायची. आता येथील मुले येथेच त्यावर प्रक्रिया करुन ड्राय सॅण्डचा व्यवसाय करत आहेत. त्यामुळे येथील २,५००-३,००० लोक या व्यवसायावर आपला उदरनिर्वाह करत आहेत. त्याचप्रमाणे कंपनी प्रशासनही एखादी अडचण आल्यास आमच्याशी समन्वय साधतात.

आम्ही सर्व शेतकरी आहोत. तर ही कंपनी कार्यान्वित राहण्यासाठी जी कायदेशीर बाजू आहे, ती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पाहावी. आमच्या वाडीत ८० मुले आहेत, ते गावातच का राहिले, तर त्यांना येथे रोजगार मिळाला म्हणून राहिले. तरी प्रकल्पाबाबत सकारात्मक विचार करण्यात यावा. सदरहू प्रकल्पास स्थानिकांचा पाठिंबा आहे.

**४) श्री रविंद्र सिताराम पाताडे, राहणार-आनंद नगर,**

**कासार्डे गाव, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग:-**

मी भूमीपुत्र आहे. येथे आमच्या कित्येक पिढ्या घडून गेलेल्या आहेत. मी नागरिक आहे, व्यावसायीक नाही. हे सांगण्याचे कारण माझ्या समस्या या गावाच्या समस्या होऊ शकतात, माझा आनंद हा गावाचा आनंद होऊ शकतो. महाराष्ट्र मिनरल्स कॉर्पोरेशन व सोसायटीमुळे गावाला निश्चितच फायदा झालेला आहे. येथील कंपन्या आमच्याशी संपर्कात असतात व आम्हीसुध्दा विविध विषयांबाबत त्यांच्याशी चर्चा करतो. समन्वयाने प्रश्न सुटत आहेत. गावातील शेजारी, सहकारी जे या कंपनीमध्ये काम करत आहेत, त्यांचेही सहकार्य गावातील सामाजिक कामांमध्ये मिळत आहे. त्याआधारे आमचे कासार्डे हे सिंधुदुर्गात सर्वात जास्त लोकसंख्येने असलेले गाव महाराष्ट्रात नावलौकीक मिळवून आहे. येथील व्यावसायामुळे आमच्या शाळा या विकसित करण्यात येत आहेत. मी शाळेच्या संचालक मंडळावर असून एखाद्या गोष्टीसाठी आम्ही हक्काने प्रकल्प व्यवस्थापनाकडे जातो. कंपनी प्रशासन हे १००% सहकार्य करतात. जे चांगले हे कासार्डे गावात घडणार आहे, त्याचे श्रेय हे येथील खाण उद्योगालाच आहे. अशा स्वरुपाचे सहकार्याचे वातावरण गावात राहिल अशी ग्वाही ग्रामस्थ म्हणून मी देत आहे. या प्रकल्प प्रशासनाने १९६१ मध्ये या खाणउद्योगाची मुहुर्तमेढ रोवली व येथील लोकांना रोजगार मिळूवून दिला. प्रकल्प प्रशासन व स्थानिक नागरिक एकत्र येऊन हाताची शृंखला निर्माण करुन गावाच्या विकासाचे ब्रीदवाक्य आम्ही पूर्ण करु. ही पर्यावरणविषयक जनसुनावणी असून पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतील व ते सुटतील, परंतु व्यवसाय सतत चालू राहिला पाहिजे. त्यात त्रुटी राहतील, त्या सहकार्याने दूर करता येतील. कुठल्याही प्रकारे पर्यावरणाचा -हास होणार नाही याची काळजी प्रकल्प प्रवर्तकांनी घ्यायलाच पाहिजे. त्यासाठी गावातील लोकही त्यांना खांद्याला खांदा लावून मदत करणार आहोत.

**५) श्री प्रकाश सुमन तिरोडकर उर्फ बाबू तिरोडकर,**

**कासार्डी जांभूळवाडी, तालुका-कणकवली,जिल्हा-सिंधुदुर्ग:-**

मी कासार्डे गावचा भूमीपुत्र असून कासार्डे गावचा टॅक्स पेअर आहे. त्यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले की कासार्डे गावाचे सर्वेक्षण हे इंग्रजांच्या काळात झालेले असून येथील खनिजांचे उत्खनन व्हावे म्हणून शासनस्तरावर प्रयत्न होते. खनिज ही आपल्या देशाची संपती असून खनिज उत्खनन हे करावेच लागते.

सादरीकरणात दर्शविल्याप्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी जल, हवा, जमिन यांवर प्रदूषण न होण्यासाठी विविध उपाय अंगिकारलेले आहेत. कंपनीमुळे रोजगार निर्मिती ही होतच आहे. येथे एका स्थानिकांनी कंपनीच्या हरित पट्ट्याबाबत आक्षेप उपस्थित केले. हरित पट्टा म्हणजे झाडे सरळ एका पट्टयात लावणे नाही.

तर प्रकल्पाच्या सभोवती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या निर्देशांनुसार झाडांच्या प्रजाती लावणे, जेणेकरुन धुळीचा व ध्वनीचा त्रास नियंत्रणात राहिल. काहींचा प्रकल्पास विरोध असू शकतो. स्थानिक, प्रकल्प परिसरातील कुशल, अर्धकुशल, अकुशल लोकांना प्रकल्पात सामाऊन घ्यायचे आहे. सीएसआर निधी स्थानिक विकासासाठी खर्च करण्यात यावा, त्याचप्रमाणे विविध विकास योजना या तयार करण्यात याव्यात. प्रकल्प विस्तारिकरण व प्रकल्प विकसित करताना झाडे तोडावी लागली तर पाचपट झाडे लावण्यात यावीत.

जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारित खनिज निधी असतो, त्यामुळे कासुर्डे गावाला त्याचा फायदा होत नाही. महाराष्ट्राचे हिवाळी अधिवेशन हे नागपूरात होते व खनिकर्मांचे मुख्यालय हे नागपूरात आहे. तरी महाराष्ट्र मिनरल्सचे अधिकारी, शासनाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी. या विभागाचे खासदार यांनी खनिकर्म विभागाचा जो निधी असतो, त्याचा कासुर्डे गावास प्रत्यक्ष फायदा व रुग्णवाहिका घेण्यासाठी, परिसरात वैदकीय व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी आतापासून प्रस्ताव तयार करुन तो निधी कासुर्डे गावाला व परिसराला जास्तीतजास्त कसा मिळेल हे आतापासून पाहायचे आहे. देशाच्या व राज्याच्या ब-याच भागात उद्योगांना विरोध होतो, पण आम्ही कासार्डे ग्रामस्थ हे प्रकल्पाचे स्वागतच करतो. केंद्र व राज्य शासनाच्या सर्व नियमांच्या अधिन राहून प्रकल्प येथे विकसित व्हावा, त्याचा फायदा कासुर्डे गावाला व परिसराला व्हावा असे मनोगत व्यक्त करतो.

पश्चिम घाट,जंगल व खाण व वनस्पती यांची हानी होत आहे हे ब-याचशा अहवालात सिध्द झालेले होते. या अनुषगाने केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांनी विविध नियम वन, पर्यावरण व खाण व खनिज नियम येते लागलेले असून आज ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणविषययक जाहिर जनसुनावणी आयोजित केलेली आहे.

६) **<u>श्री संतोष कानडे, राहणार-पियाळी गाव, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्ग:-</u>**

महाराष्ट्र मिनरल्स कॉर्पोरेशनने गेले पन्नास वर्षे येथे व्यवसाय केलेला आहे. व्यवसाय करताना स्थानिकांना आर्थिक सक्षम करण्याचे काम या कंपनी प्रशासनाने केलेले आहे. प्रकल्प विस्तारिकरण करण्यासाठी प्रकल्प परिसरातील १० कि.मी. परिघाचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे व विस्तारिकरणामुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य आघात/प्रदूषण नियंत्रण उपाय योजना सादरीकरणात सागितल्या. मात्र प्रकल्पामुळे कुठलाही त्रास, अडचणी येत नसून, त्या शासनामुळे येत आहेत.

या प्रकल्पामुळे लाखो रुपयांची रॉयल्टी ही शासनाकडे जमा होते. तर ती रॉयल्टी प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावांच्या विकासासाठीच खर्च करणे भाग आहे. खनिकर्म समिती ही जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असते व त्यात पालकमंत्री आणि सद्स्य आहेत. बैठकीत उपस्थित स्थानिकांना त्रुटी माहित आहेत, तरी उपस्थित ग्रामस्थांपैकी एकजण आपण सदस्य म्हणून खनिकर्म समितीत घ्यावा अशी शासनास विनंती आहे. रॉयल्टी कुठे व किती प्रमाणात खर्च करावी हे येथील नागरिकच सांगू शकतात. येथे महाराष्ट्र मिनरल्स ही एकच कंपनी कार्यरत आहे. जिल्ह्यामधील सर्व शाळा बंद पडल्या. मात्र परिसरातील शाळांचा हजेरीपट हा दर्जेदार राहिला. कारण येथील नागरिक स्थानिक उद्योगक्षेत्रात सहभागी झाल्यामुळे त्यांची मुले येथील शाळेत शिकत आहेत.

त्याचप्रमाणे कासार्डे गावाजवळून शिवगंगा नदी वाहते व मानाचा सावळा डोंगर आहे. तर तेथे सामाजीक वनीकरणाच्या माध्यमातून झाडांची लागवड झाली पाहिजे. सामाजीक वनीकरण विभागाने जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी वने उभारण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे कासार्डेचा सावळा डोंगर हा वनविभागाच्या अखत्यारित आहे. तर सामाजिक वन विभागातून हा सावळा डोंगर हरित् करण्याची चांगली

संधी आलेली आहे. गेल्या ४० वर्षात येथे अनेक खाणी निर्माण झाल्या, त्यात आता चांगले/दर्जेदार पाणी आहे. सदरहू प्रकल्प शिवगंगा नदीतून लाखो लिटर पाण्याचा उपसा करते. तर शासनाच्या नव्या योजनेनुसार शासनाने बैठक बोलवावी व पाण्यासाठी एक योजना तयार करण्यात यावी. उरलेल्या वाड्या, जमिन ओलिताखाली आणण्यात यावी. शासनामार्फत ही योजना राबविण्यात यावी. हे पाणी सांडपाणी म्हणून सोडून देण्यात येते. तर शासनाची व प्रकल्प प्रवर्तक/कंपनी यांची संयुक्त योजना तयार करण्यात यावी आणि ते पाणी महामार्गाजवळील गावांसाठी योजना केल्यास या योजनेमुळे हा गाव आर्थिकदृट्या समृध्द होईल.

शाळा, रुग्णवाहिका या गोष्टी होत आहेत. येथे विकासाच्या पायाभूत सुविधा गावात असणे आवश्यक आहे. शासन रस्ते तयार करते. कंपनीच्या ओव्हर लोडेड गाड्या हा रस्त्यावरुन जातात. तरी विनंती आहे की खनिकर्माच्या माध्यमातून रॉयल्टी म्हणून करोडो रुपये शासन घेते, तर ते प्रकल्प बाधित गावांमधून खर्च करण्यात यावेत. कारण गावातील या रस्त्यास जिल्हा मार्ग म्हणून मान्यता मिळालेली असून तो खनिकर्म निधीतून सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता व्हावा ही विनंती करण्यात येते. आता खनिकर्म निधीतील ८-१० कोटी रूपये शिल्लक असून ती सर्व रक्कम आमच्या रस्त्यासाठी द्यावेत अशी मी विनंती करतो.

पुन्हा एकदा लाखो व्यवसाय उत्पन्न करणा-या या महाराष्ट्र मिनरल्स कॉर्पोरेशनला पुन्हा एकदा ४,५०,७४२ प्रति वर्षीची जी लीज आहे त्यास आपण मान्यता द्यावी. इतर अनेक खाणी बंद झाल्या मात्र ही चालू आहे कारण येथे सर्वांची साथ आहे. अंमलबजावणी करणे ही एकट्या महाराष्ट्र मिनरल्सची नसून आमचीसुध्दा आहे, कारण आम्हीसुध्दा जबाबदार नागरिक आहोत. तरी प्रकल्प अंमलबजावणीतील त्रुटी दूर करुन या प्रकल्पास मान्यता देण्यात यावी.

७) **श्री दिलीप तळेकर, राहणार-तळेरे गाव,**

**माजी सभापती, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

येथे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने आयोजित पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. ही कंपनी आमच्या जन्माच्या अगोदरपासून चालू आहे. मात्र गेले १०-१५ वर्षात या व्यवसायाने एवढी भरारी घेतली आहे की येथील सर्व तरुण मंडळी पाहिली की त्याचा अंदाज येतो. हजारो कुटुंब या व्यवसायाशी निगडीत झालेली आहे. येथील अप्रत्यक्ष रोजगारात प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. तळेरे गावाची संपूर्ण बाजारपेठ ही या कंपनीच्या उपक्रमामुळेच आहे. येथील प्राथमिक शाळेतील हजेरीपटही जिल्ह्यातील शाळांपेक्षा वरचढ आहे. प्रकल्प विस्तारिकरण हे या तरुण वर्गांमुळे होत असून, भविष्यात या तरुण वर्गाने सहभाग घ्यावा असे मी आवाहन करतो, त्यामुळे प्रकल्पाचे विस्तारिकरण अजुन होईल.

तरी मी प्रकल्प प्रवर्तकांना विनंती करतो की येथे प्रोसेसिंग प्रकल्प उभारण्यात यावा, जेणेकरुन येथील स्थानिक तरुणांना रोजगाराची संधि मिळेल. तसेच पर्यावरण संतुलन राहण्यासाठी कंपनीने सदोदीत प्रयत्न करावेत.

८) **श्री संजय संभाजी पाताडे, राहणार- कासार्डे, दक्षिण**

**गावठाण, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

मी शेतकरी असून मायनिंगमध्ये काम केलेले आहे. आता ब-याच वक्त्यांनी सांगितले की या महाराष्ट्र मिनिरल्स कॉर्पोरेशनमुळे गावाची प्रगती झालेली असून लोक आर्थिक सक्षम झालेले आहेत. खरोखरच कंपनीचा त्यात मोठा वाटा आहे. एवढा मोठा व्यवसाय करताना त्यात त्रुटी राहू शकतात. ही लोकशाही आहे, तसेच प्रत्येकाला स्वतःचे मत मांडण्याचा अधिकार आहे तरी प्रत्येकाला मत मांडून द्यावे.

मी तालुका पत्रकार संघाच सदस्य असून मी फ्री लान्स पत्रकारिता करतो. कासार्डे येथे ज्वलंत प्रश्न असतात, अटीतटीचे प्रश्न असतात, संवेदनशील असतात, पण मी कधीही हस्तक्षेप केला का हे स्थानिकच सांगतील

प्रसिध्दीच्या बाबतीत काही त्रुटी राहून गेलेल्या आहेत. त्याबाबत सूचना/आक्षेप मांडत आहे –

अ) व्यवसायाबरोबरच प्रकल्प सामाजीक बांधिलकी पाळत आहे. त्यांनी अक्षरमाया हे सॉफ्टवेअर विकसित केलेले आहे. मात्र तो शॉर्ट कट अवलंबिलेला आहे. ते इंग्रजीचे रुपांतर असून त्यामुळे बरेच ठिकाणी शब्दांचे अनर्थ झालेले आहेत. शब्दबोध झाला नाही तर प्रश्न कसे मांडणार?

आ) सर्वांनी बरेच मुद्दे मांडले, मी समन्वयक म्हणून ग्रामस्थ व व्यावसायिक (प्रकल्प प्रवर्तक) यांच्यात काम करतो. एकत्र बसून गुण्यागोविंदाने आम्ही ब-याच गोष्टी सोडवत असतो. ती सर्व जबाबदारी माझ्या वर असते. म्हणेज बैठक बोलावणे, बैठक चालविणे, त्याचे इतिवृत्त तयार करणे इ. करतो. मी स्वतः रस्त्यात उभे राहून रस्त्यातील खड्डे भरणे, रस्ते साफ करुन घेणे, त्याबाबत माहिती पुरविणे अशा प्रकारची जबाबदारी सांभाळली होती.

येथील रस्त्याची दुरावस्था ही मोठी गंभीर बाब आहे. आमच्या गावाची, परिसराची समृध्दी ही झालीच पाहिजे. मात्र ईआयए अहवालात रस्त्याची फक्त डागडुजी होईल एवढेच नमूद करण्यात आलेले आहे. जर उत्पादन हे तिप्पट वाढविणार आहात, तर त्यानुसार आपणाकडे पायाभूत सुविधा आहेत का? त्या पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आपण प्रयत्न कसे करणार आहात? शासन स्तरावरिल प्रश्न हे वेगळे आहेत. स्थानिकांची मागणी आहे की गावातील मुले स्वावलंबी, आत्मनिर्भर होण्यासाठी गावातीलच कंत्राटदारांना कंपनीची कामे देण्यात यावीत. महाराष्ट्र मिनरल्स कंपनीने याबाबत आपले धोरण जाहिर करावे. तसेच रस्ते डागडुजी व त्याबाबत धोरण हे स्पष्ट करण्यात यावे. व्यवसाय करताना कंपनी त्याचा फायदा पाहणारच, ते योग्य आहे, मात्र स्थानिकांना रोजगारात, कंत्राटी कामात प्राधान्य देण्यात यावे व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे.

९) **<u>श्री सुधाकर (बाबू) सुरेश पेढणेकर, माजी उप-सरपंच,</u>**

**<u>राहणार-कासार्डे -पारकरवाडी, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्गः-</u>**

येथे जनसुनावणीत प्रत्येक वक्त्याने आपले विचार मांडले. कोणी त्यांच्या वाडीचे, रस्त्याचे प्रश्न मांडले. जनसुनावणीते ते मांडणारच. गावात बंजारा समाजाचे लोक आहेत. ते गाड्या लोडिंग करतात. ते काम करतात. त्यांची मुले तहसीलदारपर्यंत पोचलेली आहेत, याचा मला अभिमान आहे. येथील सर्व समाजातील मुले विविध स्पर्धा देत आहेत. परिसरातील ही चांगली स्थिती खाणीमुळेच झालेली आहे. मला कंपनीला विरोध करायचा नाही. कारण विरोध करण्याची गोष्टच नाही. गावात पाण्याच प्रश्न होता, तर कंपनीने त्यांच्या खर्चाने बोअरिंग करुन दिलेले आहे. महाराष्ट्र मिनरल्स कंपनी ही गावातील प्रत्येक व्यक्तीचा आदर करते. मात्र कासार्डेचा निधी हा दुस-या गावात दुस-या कामाला जातो. याबाबत शासनाने//महाराष्ट्र प्रदषण नियंत्रण मंडळाने लक्ष घालावे.येथे रस्ता दुरुस्त करण्यात येतो, पण लोडच्या गाड्या असल्याने रस्ता टिकत नाही. गावात एकोपा असून सर्व एकरुप आहेत. तरी प्रकल्पास मंजूरी ही जास्तीतजास्त देण्यात यावी.

**<u>१०) श्री प्रकाश सखाराम पारकर, माजी उप-सभापती,</u>**

**<u>कासार्डे-पारकरवाडी, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्गः-</u>**

पर्यावरणविषयक जनसुनावणीत सर्वांचेच स्वागत. येथील स्थानिकांमधील जे वक्ते बोलले, त्या सर्वांनीच प्रकल्प विस्तारीकरण व लीज वाढविण्यास पाठिंबा दिलेला आहे. आम्ही लहान असल्यापासून

गावाचा विकास बघत आहोत. गावक-यांच्या दृष्टीने ही वाळूची खाण नसून सोन्याची खाण आहे. गावाचा प्रकल्पास पाठिंबा. मात्र शासनाचे सर्व अधिनियम पाळून सदरहू प्रकल्प कार्यान्वित रहावा. कंपनीने बैठकीत करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन त्याप्रमाणे सुधारणा कराव्यात. शासनाचे सर्व निर्देश तंतोतंत पाळण्यात यावेत. प्रकल्पास शुभेच्छा.

११) **श्री गणेश तुकाराम पेडणेकर, माहितीचा अधिकार कार्यकर्ता,**

**राहणार-कासार्डे, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

येथे शासकीय प्रशासन व कंपनी यांच्यात ताळमेळ दिसत आहे. स्थानिक प्रश्न असू शकतात. कंपनीने स्वबळावर ते सोडवावेत. मायनींग व्यवसाय हा चालू राहिलाच पाहिजे. त्यामुळे प्रगती आहेच. तरी सर्व कायदे पाळूनच कंपनीने व्यवसाय करावा.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. त्यावेळी उपस्थितांनी दुपारची जनसुनावणी ही त्वरित घेण्याची मागणी केली. सदस्य यांनी सांगितले की नियमानुसार दुपारची जनसुनावणी ही त्यावेळेलच दुपारीच घेण्यात येईल.

१२) **श्री संजय धनंजय देसाई, माजी जिल्हा परिषद सदस्य-**

**सिंधुदुर्ग, राहणार-कासार्डे, तालुका-कणकवली, जिल्हा-सिंधुदुर्गः-**

मी आज पर्यावरणावर बोलणार आहे. माझे कासार्डे गाव जेथे मायनिंग चालते, तेथे २३ वाड्या आहेत. जवळजवळ ७,००० लोकसंख्या आहे. तेथून ५-७ कि.मी. अंतरावर सावळा डोंगर आहे. तो सृष्टीसोंदर्याने नटलेला आहे. ते आमच्या कासार्डे गावाचे श्रेय आहे. तसेच प्रत्येक मंदिरात वनराई आहे. नंतर एक शासकीय समिती आलेली होती. त्यांनी माझी कासार्डे गावासाठी माझी वसुंधरा साठी नेमणूक केलेली आहे. सांगायला आनंद वाटतो की माझ्या कासार्डे गावात २०० वर्षापूर्वीचीसुध्दा झाडे आहेत. त्यांना नंबर्स देणे सुरु झालेले आहे. तसेच माझी वसुंधरा योजनेखाली आम्ही एक भूखंड घेणार आहोत. तेथे जास्त ऑक्सीजन देणारी झाडे लावत आहोत, उदा-वड, पिंपळ. महाराष्ट्र मिनरल्स कॉर्पोरेशन व सोनावडी हे स्थानिकांना विश्वासात घेऊनच उपक्रम चालवितात. २५ वर्षापूर्वी पाण्याचे दुर्भिक्ष होते. वणवण फिरावे लागे. आज बोअरिंगला, विहिरीला पाणी लागते. तर आता पाण्याचा त्रास होत नाही.

तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की या प्रकल्पास सर्व अटी व शर्ती लावून प्रकल्पास मान्यता देण्यात यावी.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी समारोप करताना सांगितले एकूण १२ व्यक्तींनी प्रत्यक्ष सूचना, विचार किंवा आक्षेप उपस्थित केलेले आहेत. सर्वांचे धन्यवाद कारण उपस्थितांनी चर्चेमध्ये भाग घेतला.

पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की चर्चेत असा आक्षेप नोंदविण्यात आला की हा ईआयए अहवाल कोणी बनविला, ती मान्यताप्राप्त संस्था आहे का? तर मी महाराष्ट्र मिनरल्स कॉर्पोरेशनचा प्रतिनिधी नसून ओपन आर्क डिझाईन अणि एन्व्हायरो सोल्यूशन्स एलएलपी चा आहे. त्यांनी पुढे सांगितले की भारत सरकारची नाबेट ही स्वायत्त संस्था आहे. त्याकडून आम्हांला Certificate of Accreditation प्राप्त आहे. त्यानुसार आमच्या संस्थेने पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निर्देशांनुसार तयार करण्यात आलेला आहे. या बैठकीत असा आक्षेप नोंदविण्यात आला की पर्यावरण अहवाल हा उपलब्ध करण्यात आलेला नाही. तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या रत्नागिरी उप प्रादेशिक कार्यालय यांनी पर्यावरण

आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या तीस दिवस अगोदर एक स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजी भाषेत जाहिर सूचना प्रकाशित केली व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व सर्व दस्तावेज शासनाच्या अधिसूचित कार्यालयात जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध करण्यात आलेला होते.

त्यांनी पुढे सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात नोंद घेण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक मेजर नाईक यांनी व्यासपीठावरील सर्व मान्यवरांचे व व्यवसायाला प्रोत्साहन दिले म्हणून उपस्थितांचे आभार मानले. त्यांनी आश्वासन दिले की जे काही कायदेशीर आहे, ते सर्व कंपनी करेल. कंपनी जसे सहकार्य करते, भविष्यात तसेच चालू राहिल.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व मान्यवर, लोकप्रतिनिधी व स्थानिक जे बहुसंख्येने उपस्थित होते त्यांचे आभार मानले. त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही अत्यंत चांगल्या वातावरणात पार पडली. बैठकीत बारा स्थानिक व्यक्तींनी सूचना, आक्षेप नोंदविलेले आहेत, त्यास कंपनीच्या प्रतिनिधींनी योग्यप्रकारे उत्तर दिले. बैठकीत उपस्थितांनासुध्दा प्रकल्पास पाठिंबा देताना सांगितले की प्रकल्पाचे विस्तारिकरण हे सर्व निर्देश पाळण्यात येऊन करण्यात यावे. अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानले व जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी संपल्याचे जाहीर करण्यात आले.

प्राप्त ०६ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहे.

**(राहुल द. मोटे)**
समन्वयक,
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रत्नागिरी

**(जगन्नाथ शं. साळुंखे)**
सदस्य,
तथा
प्रादेशिक अधिकारी-कोल्हापूर
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
कोल्हापूर

**(मच्छिंद्र सुकटे)**
अध्यक्ष,
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग
जिल्हा - सिंधुदुर्ग